॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

# भावार्थ गीता

## अध्याय पहिला

१ धृतराष्ट्र म्हणे, ‘कुरु क्षेत्र जें पावन धर्म-स्थान
संग्रामास्तव उभे ठाकले तिथें घेउनी बाण १
माझे आणिक कुमर पंडुचे काय तयांनीं केलें
सांग संजया, तें ऐकाया असती कान भुकेले.’ २

२ संजय बोले कौरवेश्वरा, ऐक चित्त देऊन
पांडव-सेना रणीं राहिली नाना व्यूह रचून ३
अवलोकुनि ती मुळीं न नृ-पति दुर्योधन घाबरला
द्रोणाचार्यांनिकट येउनी बोल बोलता झाला. ४

३ म्हणे, ‘गुरु-वरा, पहा जरा ही विशाळ पांडव-सेना
तयें चि रचिली द्रुपद-पुत्र जो तुमचा शिष्य शहाणा ५

४ पाहा पहा हे महा-धनुर्धर येथ शूर नर-वीर
युद्धीं भीमार्जुनांसारिखे थोर निपुण रण-धीर ६

महा-रथी हा द्रुपद सात्यकी येथें नृ-पति विराट
५ धृष्टकेतु हा चेकितान हा काशिराज बलवंत ७

तसा चि पुरुजित् कुंतिभोज तो शैब्य नरेश हि दिसतो
६ विक्रमशाली युधामन्यु तो तसा उत्तमौजा तो ८

आणि सुभद्रा-सुत सु-धीर हा अभिमन्यु असे येथें
तसे द्रौपदी-कुमर सकल हि महा-रथी ते तेथें ९

७ ध्यानीं घ्यावे प्रमुख आमुचे नायक जे सैन्याचे
तुम्हां कळावे ह्यास्तव करितों दिग्दर्शन मी त्यांचें १०

८ आपण तैसे भीष्म पितामह विजयी कृप हा कर्ण
अश्वत्थामा सौमदत्ति हा तेविं असे चि विकर्ण ११

९ आणिक हि दुजे मजकरितां जे उदार जीवावरती
जे तळहातीं शीर घेउनी सजले धारातीर्थी १२

नाना शस्त्र-प्रहार-विद्या-पारंगत जे झाले
असे लाभले बहुत हे भले युद्ध-धुरंधर सगळे १३

१० अफाट अमुचें सैन्य त्यावरी अधिपत्य भीष्माचें
भीमाहातीं असे मोजकें बल हें प्रतिपक्षाचें १४

११ प्रवेश-मार्गी दक्ष राहुनी आपआपुल्या स्थानीं
भीष्माचार्यां संरक्षावें अतां रणीं सर्वांनीं.’ १५

संजय बोले पुढें सांगतों वृत्त काय घडलें तें
कुरु-कुलाधिपा, ऐकें बापा आतां सावध-चित्तें १६

१२ प्रतापशाली वृद्ध पितामह सेनापति जो तेथें
तयें स्वभावें तोषवावया दुर्योधन नृपतीतें १७

उच्च रवानें वीर-वृत्तिनें सिंह-गर्जना केली
नाद-निनादें रण-भूमि तदा ती दुमदुमुनी गेली १८

आणि तत्क्षणीं स्फुरण चढोनी दिव्य शंख वाजविला
तोंचि मागुतीं ध्वनी तयाचा गगन भेदुनी गेला १९

१३ मृदंग भेरी शंख तुतारी नाना रण-वाद्यांचा
एक चि तुंबळ नाद जाहला तेथें वीर-रसाचा २०

तों पार्थ-रथीं दिसे सारथी हरि गिरि-धर यदु-राणा
निज-भक्ताचें सारथ्य करी धरुनी स्व-करीं रशना २१

जया रथातें चपळ धांवते धवल-वर्ण साचार
सतेज सुंदर नयन-मनोहर अश्व जोडिले चार २२

त्या भव्य रथीं श्रीकृष्णार्जुन-नरनारायण-जोडी
बसुनि सांकडें अखिल जगाचें लीलामात्रें फेडी २३

१५ श्रीभगवंतें पांच-जन्य तो देव-दत्त विजयानें
महा-शंख तो पौंड्र फुंकिला त्या बलाढ्य भीमानें २४

१६ अनंत-विजय ज्येष्ठ पांडवें युधिष्ठिरें आस्फुरिला
सुघोष नकुलें मणि-पुष्पक तों सहदेवें वाजविला २५

१७ महा-धनुर्धर काश्य शिखंडी महा-रथी गर्जून
शंख फुंकिती जयी सात्यकी विराट धृष्टद्युम्न २६

१८ द्रौपदेय ते तसा द्रुपद तो सौभद्र हि बल-तरणी
ह्या सर्वांनीं शंख फुंकिले रणीं सर्व बाजूंनीं २७

१९ दुमदुमल्या त्या दहा दिशा ती पृथ्वी नभ संपूर्ण
त्या तुमुल-रवें कौरव-हृदयें शतधा होत विदीर्ण २८

२० तदा कपि-ध्वज अर्जुन सहजें निज-धनुष्य उचलून
रणार्थ पुनरपि नीट उभे तें कौरव-जन देखून २९

२१ रण-प्रसंगीं श्रीकृष्णातें म्हणे, 'हाकवीं वाजी
करीं रथ उभा अतां अच्युता, दोन्ही सैन्यामाजीं ३०

२२ उभे ठाकले रणीं लढाया कोण कोण हे धीट
मी हि लढावें कुणाकुणाशीं पाहें जोंवरि नीट ३१

२३ तेविं झुंजते वीर जे इथें बघुनी घेतों त्यांतें
तुष्ट कराया इच्छिति दुर्मति दुर्योधन नृपतीतें.' ३२

२४ एकें राजा, श्रवणीं पडतां पार्थ-वच असें तेथें
नेउनि केला उभा त्वरित तो उत्तम रथ यदु-नाथें ३३

२५ भीष्म द्रोणां - सकळ नृपाळां-सन्मुख उभय-चमूंत
आणि म्हणे तो, 'पाहें पार्था, कौरव जमले येथ.' ३४

२६ तदा देखिले उभे ठाकले रणीं अर्जुनें तेथें
पितर पितामह पुत्र पौत्र गुरु तसे मातुल भ्राते ३५

२७ सुहृद सासरे सखे सोयरे सकल गोत्र देखून
मनिं गजबजला तो गहिंवरला क्षणांत झाला खिन्न ३६

२८ रणांत करुणा-वृत्ति अंतरीं होतां स्थानापन्न
रण स्वामिनी वीर-वृत्ति ती गेली त्वरित निघून ३७

अपमानास्पद असें दृश्य तें कसें बरें पाहील ?
कोण मानिनी स्व-पति लक्षितां दुजीस तें साहील ? ३८

निष्ठुर होतां भ्रमर हि भेदी काष्ठ कोरडें कठिण
परि गुंतुनी मृदुल कुमुदिनीमाजीं वेंची प्राण ३९

तेंविं गुंतला स्व-जन-स्नेहीं पार्थ तो यशोधवल
अति कोमल परि कठिण तुटाया स्नेह-बंध हें नवल ! ४०

हृदय बावरे कारुण्य-भरें शौर्य लोपलें सारें
दीन होउनी श्रीकृष्णातें म्हणे, ‘पहा कंसारे, ४१

२९ गळून गेलीं गात्रें सगळीं तोंड कोरडें होई
अंग थरथरे भरे कांपरें तनु रोमांचित पाहीं ४२

३० मुळीं न कळलें कसें निसटलें हातांतुनि गाण्डीव
स्थिर न राहवे जळे त्वचा जणुं भोंवे माझा जीव ४३

३१ दिसती देवा, कशीं केशवा, अशुभ लक्षणें जाण
युद्धीं स्व-जनां वधुनि दिसेना परिणामीं कल्याण ! ४४

३२ नको चि जय तो नको राज्य तें नको सौख्य गोविंदा !
हवी कुणाला भोग-संपदा ? काय जगून मुकुंदा ? ४५

३३ इच्छावे ते भोग सुखें तीं राज्य हि ज्यांप्रीत्यर्थ
सिद्ध लढाया ते चि सोडुनी प्राण आणखीं अर्थ ४६

३४ पितर पितामह पुत्र पौत्र गुरु पुढें चि दिसती युद्धीं
तेंवि मातुल श्वशुर मेहुणे आणि आप्तसंबंधी ४७

३५ वध ह्यांचा न च करूं इच्छितों वधितील जरी मातें
त्रैलोक्याचें राज्य तुच्छ तें कोण गणी पृथ्वीतें ४८

३६ वधुनि कौरवां स्व-जन-बांधवां सुख काय अम्हां येथें
श्रेय कायसें तरि पर-लोकीं जनार्दना, सांगें तें ४९

जरी जाहले दुःस्वभाव हे दुष्टपणाची खाण
तरी स्व-जन हे वधितां ह्यांतें पाप आमुतें जाण ५०

३७ स्व-जन-बांधवांसवें झुंजतां होइल कुल-संहार
आणि केशवा, कुल-संहरणीं दोष असे अनिवार ५१

प्रबळे अग्नी त्या उद्यानीं क्षण हि न कोकिळ राहे
तेंविं तूं अम्हां पापकृत्तमां सांडिशील लवलाहें ५२

महद्भाग्य तें म्हणुनि आमुतें असे तुझा आधार
पुण्य संपतां तूं दुरावतां सर्वत्र चि अंधार ! ५३

तरी श्रीहरी, सर्वतोपरी अनुचित हें आम्हांतें
स्व-जनां वधुनी इह-पर-लोकीं पाप चि पदरीं येतें ५४

३८ बुद्धि नाशिली लोभें म्हणुनी नेणती चि हे कांहीं
कुल-क्षयीं तो दोष केवढा पाप हि मित्र-द्रोहीं ५५

३९ कां न कळावें परंतु आम्हां देवा, हे जाणून
निवृत्त व्हावें कुल-क्षयाच्या ह्या पापापासून ५६

४० कुल-संहरणीं लोप पावती ते शाश्वत कुल-धर्म
धर्म लोपतां सहजें ग्रासी सकल कुलासि अधर्म ५७

४१ जेंवि तेवता दीप दवडुनी अंधारांत शिरावें
आणि चालतां सरळ मागुतीं धडपडुनी घसरावें ५८

तेविं माजतां अधर्म-तम तो वर्णावर्ण-विचार
मुळीं न च उरे कुळीं भ्रष्टती कुल-स्त्रिया साचार ५९

स्त्रियां भ्रष्टतां संकर होतो मग चारी वर्णांचा
वर्ण-संकरीं प्रवेश होतो कुळीं महा-पापांचा ६०

४२ व्याळ डंखितां नखीं विष चढे नख-शिखान्त सर्वांगीं
तेविं दोष तो कुलघ्नासवें जाळितो कुळालागीं ६१

आणि कुळासह कुल-घ्न सर्व हि नरकीं पडती तेव्हां
वर्ण-संकरें महा-पातकें कुळांत शिरती जेव्हां ६२

पिण्ड-दान तें तिळोदक तसें पितरां अर्पी कवण
श्राद्ध लोपतां पितर तयांचे पावती अधःपतन ६३

४३ कुल-घ्न पापी आचरिती हें संकर-कारक कर्म
म्हणुनि लोपती जाति-धर्म ते ते शाश्वत कुलधर्म ६४

४४ ज्या कुळांत कुळ-धर्म लोपले त्या कुळांत सर्वांना
नरक-वास तो निश्चित ऐसें ऐकत आलों कृष्णा ६५

४५ अहो केवढें महत्पाप हें आदरिलें ह्या समया
राज्य-सुखास्तव उद्यत झालों लोभें स्व-जन वधाया ! ६६

४६ त्याहुनि समरीं सशस्त्र कौरव मारितील मज तरि तें
बरें स्वभावें मी न लढावें करुनी प्रतिकारातें ६७

स्व-जन-वध नको राज्य-सुख नको भलें त्याहुनी मरण
जाण अच्युता, ह्यांत चि माझें दिसे परम कल्याण !' ६८

४७ असें बोलुनी तो पार्थ रणीं व्याकुळ शोकावेगें
धनुष्य आणिक बाण टाकुनी स्व-रथीं बसला मागें ६९

येथें भावार्थ गीतेचा प्रथमाध्याय संपला ।
युद्धीं पार्थ-विषादाचा योग ह्यांत निवेदिला ॥ १ ॥